# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** गांधी नगर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0022 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/01/2020 22:57 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** रविवार **Date From (दिनांक पासून):** 26/01/2020

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/01/2020

**Time From (वेळेपासून):** 12:08 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:17 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 26/01/2020 **Time (वेळ):** 21:35 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 025 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/01/2020 21:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 07 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आरोपी नं 2 यांचे आर-कॉम्प्यु, मेन रोड, उचगांव, ,करवीर कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** ड. राजेंद्र रामचंद्र इंगवले

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अंबाबाई मंदिराजवळ,राधानगरी, जि कोल्हापूर,राधानगरी, जि कोल्हापूर,राधानगरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अंबाबाई मंदिराजवळ,राधानगरी, जि कोल्हापूर,राधानगरी, जि कोल्हापूर,राधानगरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | डॉ. सुनिल आप्पासाहेब कुरूंदवाडे | | | 1. राजारामपुरी 5 वी गल्ली,विश्वनाथ कोऑप हौसिंग सोसायट,कोल्हापूर, करवीर ,राजारामपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | सुहास कष्णा टक्केकर | | | 1. रा ए/3, बी एस एन एल स्टाफ क्व, टेंबलाई नाका, कोल्हापूर,करवीर , राजारामपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/रु च्या 13 नोटा व 500/रु च्या 8 नोटा | 30,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 30,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी राजेंद्र रामचंद्र इंगवले, वय-44, व्यवसाय- डाक्टर, राधानगरी, अंबाबाई मंदीराजवळ, रा.राधानगरी, मोबाईल नं. 9270002086, समक्ष गांधीनगर पोलीस ठाणेत हजर राहुन लिहुन देतो फिर्याद अशी की, मी वरील पत्यावर कुटूंबियासह राहण्स आहे. मी ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथ् वैद्यकिय अधिकारी म्हणून शासनाचे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य क्रार्यक्रम योजनेअंतर्गत 11 महीन्यांचे कालावधीकरीता कर्तव्यावर आहे. माझेप्रमाणे शासनाचे नमुद योजनेअंतर्गत ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथ् अन्य 02 वैद्यकीय अधिकारी, 02 फार्मासिस्ट, 02 नर्स असे एकुण 07 जण कर्तव्यावर आहेत. माझी व इतर स्टाफची शासनाचे नमुद योजनेअंतर्गत झालेल्या ऑर्डरची मुदत फेब्रुवारी महिन्यात संपणार आहे. तत्पुर्वी ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे आमचे पुर्ननियुक्तीकरीता सर्वांचे मागील सेवाकालावधीतील परफार्मन्स रिपोर्ट वैद्यकिय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, राधानगरी यांनी लिहून सिव्हील सर्जन, कोल्हापूर यांचेकडे पाठवावा लागतो. त्यानुसार सिव्हील सर्जन,सीपीआर हास्पीटल, कोल्हापूर यांचेकडून आमचे परफार्मन्स रिपोर्ट पाहून आमचे पुर्ननियुक्ती व वेतनवाढीचा आदेश काढला जातो. मला तसेच इतर स्टाफला पुन्हा ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे शासनाचे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य क्रार्यक्रम योजनेअंतर्गत 11 महीन्यांकरीता काम करावयाची ईच्छा आहे. त्यापुर्वी आमचे ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथील कामाबाबत वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, राधानगरी यांचा परफर्मन्स रिपर्ट सिव्हील सर्जन, कल्हापूर यांचेकडे पाठविण् आवष्यक आहे. त्याकरीता गेल्या 8 दिवसापुर्वी मी ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथील वैद्यकिय अधीक्षक ड. कुरुंदवाडे यांना भेटल हत. त्यावेळी वैद्यकिय अधीक्षक ड.कुरुंदवाडे यांनी ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथे नविन काप्युटर खरेदीसाठी आम्हा 7 जणांचे प्रत्येकी 5,000/-रुपयेप्रमाणे एकूण 35,000/- रुपये एकत्रीत करुन मी त्यांचेकडे द्यावे लागतील, मगच मी सर्वांचा परफर्मन्स रिपर्ट सिव्हील सर्जन कोल्हापूर यांचेकडे पाठवित असे म्हणाले. तेव्हा ठिक आहे, मी इतर 6 जणांशी चर्चा करतो आणि तुम्हाला येवून भेटतो असे सांगितले होते. त्यानंतर वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथे आलेले नाहीत. त्यांचे सांगणेप्रमाणे मी माझेसोबत काम करणारे इतर स्टाफशी बोललो असून सर्वांनी वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे यांचे सांगणेप्रमाणे काप्युटर खरेदीसाठी पैसे देणेस नकार दिलेने.

आम्ही वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे यांचेविरुध्द सदरबाबत अन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार नोंद करावी असे सर्वांनी ठरविले. व सर्वांचे वतीने मी अन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार देण्याचे ठरवले. त्यानंतर मी दिनांक-23/01/2020रोजी पोलीस उपअधीक्षक श्री आदिनाथ बुधवंत साहेब यांना त्यांचा मोबाईलवर फोन करुन वरील सर्व हकीकत कळविली. त्यावेळी आम्ही शासकीय पंचासोबत आपणास राधानगरी येथे येउन भेटतो असे सांगुन याबाबत गोपनियता राखण्याच्या सुचनां दिल्या होत्या. व डा. कुरुंदवाडे हे रुग्णालयामध्ये हजर आहेत काय याबाबत खात्री केली असता, ते रुग्णालयाकडे येणार नसून ते उदईक रोजी येणार असलेचे समजलेने त्याबाबत श्री.बुधवंत यांना कळविले. दि.24/01/2020 रोजी सकाळी 11-30 वा.चे सुमारास मला पो्लीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेबांनी फोन करुन आपण राधानगरी येथे येत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यानं्ा राधानगरी गावचे अलिकडे कृष्णा राईस मिलजवळ रसत्याकडं्ेला माझी टाटा इंडीगो गाडीसह थांबतो असे कळविले होते. त्यानंतर 12-45 वा. चे सुमारांस पोलीस उपअधीक्षक श्री बुधवंत साहेब टाटा सुमो एमएच-09/0528 मधुन तिथे आले त्यांनी आपली व त्यांचा स्टाफ व पंच यांची मला ओळख करुन दिली. तेव्हा मी माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. सदर अर्ज श्री.बुधवंत व पंचानी वाचून त्यावर सहया केल्या. श्री बुधवंत यांनी व मला व दोन्ही पंचांना वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगून त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून रेकार्डरमध्ये नविन मायक्रो एसडी कार्ड घातले. त्यांनी मला व पंचाना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या सदरवेळी मी वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे ग्रामीण रुग्णालय, राधानगरी केव्हा येणार आहेत? याबाबत त्यांना फोन लावून विचारतो असे श्री.बुधवंत यांना सांगितले. व माझे मोबाईलवरुन वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे यांचे मोबाईलवर 13.18 वा. फोन लावून स्पिकर आन करुन संभाषण केले. तेव्हा वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे यांनी मी राधानगरी येथे आलो असून आता ग्रामीण रुग्णालयासमोर आहे असे सांगितले. त्यावेळी मला व पंच नं. 1 कामते यांना लागलीच ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे वैद्यकिय अधीक्षक डा.कुरुंदवाडे यांची भेट घेण्यासाठी डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करुन तो माझे गळयात शर्टचे आतील बाजूस पिवळे धातुचे चेनचे सहायाने अडकविला व मला आणि पंच नं. 1 श्री.कामते यांना माझेकडील टाटा इंडीगो कार नंबर डभ्.12ध्क्ष्. 7220 यातून ग्रामीण रुग्णालय, राधागनरी येथे 13.23 वा. रवाना केले. मी व पंच श्री. कामते ग्रामीण रुग्णालय,राधानगरी येथे जावून तेथे डा. श्री कुरुंदवाडे यांची भेट घेतली. त्यावेळी माझी व डा.कुरुंदवाडे यांची रुग्णालयात काप्युटर खरेदीसाठी जमा करणेत येणार पैशाबाबत चर्चा झाली. त्यावेळी डा. कुरुंदवाडे यांनी 7 जणांचे प्रत्येकी रु.5,000/- प्रमाणे रु.35,000/- जमा करा, ते काप्युटर बसविणेस येणारे माझे भाच्याकडे द्या असे सांगितले. त्यानंतर मी तेथून कोणास संशय येउ नये म्हणुन माझे मित्र डा.मगदुम यं्ाची मोटार सायकल घेउन श्री.बुधवंत यांचेकडे गेलो. त्यावेळी श्री बुधवंत माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 14.48 वा.बंद करुन ताब्यात घेतला. श्री बुधवंत यांनी पंच कामते यांचेकडे आमचे भेटीबाबत चैकशी केली.दरम्यान माझे मोबाईलवर ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथील शिपाई चव्हाण यांनी मला डा.कुरुंदवाडे बोलावित असलेचे सांगितले. श्री बुधवंत यांनी मला डा.कुरुंदवाडे यांनी आपणास का बोलाविले असेल? याबाबत विचारणा केली असता, कदाचित त्यांनी मागणी केलेल्या पैशासंदर्भात चर्चा करणेसाठी पुन्हा मला बोलाविले असेल असे सांगितले. त्यावेळी श्री.बुधवंत यांनी मला पुन्हा ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथे जावून डा.कुरुंदवाडे यांची भेट घेणेची सुचना दिली. तेव्हा श्री.बुधवंत यांनी डीजीटल व्हाईस रेकार्डर चालू करुन तो माझे गळयात अडकवुन मला व पंच श्री कामते यांना 14.54वा. मोटर सायकलवरुन ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे पाठविले. मी ग्रामीण रुग्णालय येथे जावून पुन्हा डा. श्री कुरुंदवाडे यांची भेट घेतली. मी डा.कुरुंदवाडे यांना तुमचे भाचे कधी येणार असे विचारता, तो उद्या येईल, त्याला सकाळीच पाठवितो असे सांगितले. तेव्हा मी आमचे सोबत असलेले डा.मगदूम यांचा परफार्मन्स रिपोर्ट आता नाही असे सांगितले असता डा.कुरुंदवाडे यांनी त्यांचे राहू देत असे सांगितले. त्यांना मी रक्कम कमी करणेची विनंती केली असता, त्यांना नकार दिला. त्यानंतर मी तेथून श्री.बुधंवत यांचेकडे गेलो. त्यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 15.06 वा. बंद करुन ताब्यात घेतला. श्री बुधवंत यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डरमधील मेमरी कार्डवर माझे आणि डा.कुरुंदवाडे यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेल्या दोन्ही फाईलमधील संभाषण पंच श्री.कामते व माझे मदतीने आवाज ओळखून ऐकले. त्यावरुन माझे व इतर वैद्यकिय अधिकारी व स्टाफ यांची शासनाचे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य क्रार्यक्रम योजनेअंतर्गत ग्रामीण रुग्णालय,राधानगरी येथे 11 महीन्यांचे पुर्ननियुक्तीकरीता आमचे मागील सेवाकालावधीतील परफार्मन्स रिपोर्ट लिहून सिव्हील सर्जन, कोल्हापूर यांचेकडे पाठविला आहे. त्याबद्दल ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे काप्युटर बसविणेसाठी 6 जणांचे प्रत्येकी रु.5,000/- प्रमाणे रु. 30,000/- द्यावे लागतील अशाप्रकारे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर लाच रक्कम उदईक रोजी कांप्युटर बसविणेसाठी त्यं्ाचा भाचा रुग्णालयात येणार आहे, त्याचेकडेच द्यावेत असे सांगितले असल्याचे त्यांना समजुन आले. त्यामुळे श्री.बुधवंत यांनी उदईक दि. 25/01/2020 रोजी राधानगरी येथे आज थं्ाबलेल्या ठिकाणीच सकाळी 10.30 वा.पर्यत येतो. तुम्ही पण या ठिकाणी या असे सांगुन गोपनियतेबाबत सुचना दिली. तसेच उदईक रोजी ग्रामीण रुग्णालय, राधानगरी येथे सापळयाचे आयोजन करणेचे ठरवून वैद्यकिय अधीक्षक डा. कुरुंदवाडे यांचे मागणीप्रमाणे रु.30,000/- त्यांचे भाचेकडे कांप्युटरची किंमत म्हणून देणसाठी घेवून येणेची मला सुचना दिली. त्यांनतर श्री. बुधवंत स्टाफ व पंचासह निघून गेले.दिनांक-25/01/2020 रोजी श्री.बुधवंत यांनी09.30 वा.चे सुमारास मी राधानगरी येथे येणेसाठी निघाल्याचे सांगितले. तसेच 10.45वा. काल थांबलेल्या ठिकाणी आलेचे सांगितले. त्यानुसार मी तेथे जावून श्री.बुधवंत यांची भेट घेतली. डा. श्री कुरुंदवाडे यांचा भाचा ग्रामीण रुग्णालयामध्ये आला आहे काय? याबाबत माहिती काढली असता तो आला नसल्याचे समजुन आलेने श्री बुधवंत सुचनेप्रमाणे डा. कुरुंदवाडे यांना 11-39 वा. फोन केला व डा. श्री कुरुंदवाडे यांचा भाचा केंव्हा येणार आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी ठिक आहे मी फोन करतो आणि बघतो तो आहे काय आणि सांगतो असे सांगितले. परंतु बराच वेळ डा. कुरुदवाडे यांचा फोन आला नाही म्हणुन पुन्हा 12-02 वा .त्यांना फोन केला असता त्यांनी मला अरे राजु तो शिरोली येथे इन्स्पेक्शनला गेला आहे. तु आता जा असे सांगितले त्यावेळी. तेव्हा मी त्यं्ाना पैसे दुसरे कोणाकडे देउ काय? असे विचारले असता त्यांनी नाही, नाही तो उद्याच येईल असे वगैरे बोलणेझाले. तेव्हा मी उदईक दि.26/01/2020 रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्य डा. श्री कुरुंदवाडे हे झेंडावंदन कार्यक्रमासाठी सकाळी येतील तेव्हा त्यांची व माझी गाठभेट होईल व कदाचित ते माझेकडे पैसे मागणेची शक्यता आहे असे श्री.बुधवंत यांना सांगितले. तेव्हा श्री.बुधवंत यांनी उदईक रोजी सकाळी 07-30 वा. पर्यत आम्ही राधानगरी येथे येतो, डा.कुरुंदवाडे राधानगरी येथे आलेस तात्काळ आम्ही थं्ाबलेल्या ठिकाणी यावे अशी सुचना दिली व ते सर्वजन कोल्हापूरला निघून गेले. आज दि.26/01/2020 रोजी सकाळी डा.कुरुंदवाडे हे झेंडावंनदनसाठी ग्रामीण रुग्णालय राधानगरी येथे हजर झालेने मी त्यांची भेट न घेता कृष्णा राईस मिलजवळ गेलो. त्यावेळी श्री बुधवंत,त्यांचा स्टाफ व पंच असे सर्वजण तेथे आले. तेव्हा मी बुधवंत यांचे सं्ागणेवरुन माझेकडील 30,000/-रुपये रक्कम हजर केली. श्री बुधवंत यांचे सुचनेनुसार स्टाफमधील स.फौ. श्री खनगांवकर यांनी लाच रक्कमेस अन्थ्रासिन पावडर लावली व त्या नोटांची घडी करुन ती माझे शर्टचे खिशात ठेवली. त्यानंतर श्री.बुधवंत यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरी कार्ड घालून तो चालू करुन माझे गळयात रेकार्डर अडकवुन मला पंचासह डा. श्री कुरुंदवाडे यांची भेट घेण्यासाठी 07-45 वा.माझेकडील मो.सायकलवरुन ग्रामीण रुग्णालयाकडे पाठविले. आमचे पाठोपाठ श्री बुधवंत स्टाफसह आले. मी ग्रामीण रुग्णालय येथे डा. श्री कुरु्ुदवाडे यांची बाहेरील बाजूस भेट घेतली असता त्यांनी आपला भाचा आज, उद्या, परवा केंव्हाही येईल ते करुन घ्या असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना मी गावी जाणार आहे असे सांगितलेवर त्यांनी सांगितले की, मी भाच्याला नंबर दिला आहे तो तुला फोन करेल असे म्हणाले. तेव्ह मी त्यांना त्यांचे भाचा यांचा मोबाईल् नंबर मागितला असता त्यं्ानी

एसएमएस करतो असे सांगून ते सोळांकूरकडे निघुन गेले. त्यानंतर श्री.बुधवंत यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 07.55 वा.बंद करुन घेतला. त्यानंतर आम्ही सर्वजन पुन्हा कृष्णा राईसमिलजवळ सर्वजण परत आलो. डा.कुरुंदवाडे यांनी त्यंाचे भाच्याचा नंबर एसएमएस केला नाही.म्हणून मी पुन्हा डा. श्री कुरुंदवाडे यांना फोन करुन विचारणा केली (मुळ फिर्याद सोबत जोडली आहे)(मुळ फिर्याद सोबत जोडली आहे)

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Dipak Shivaji Bhandwalkar(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

पोलीस ठाणे अंमलदार
शिरोळ पोलीस ठाणे
जि. कोल्हापूर.

**Name**(नाव): Dipak Shivaji Bhandwalkar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):